महाराजा सयाजीराव ज्ञानमाला : ३३

# महाराजा सयाजीराव आणि श्रीधर व्यंकटेश केतकर

## सौरभ गायकवाड




महाराजा सयाजीराव गायकवाड संशोधन व प्रशिक्षण संस्था,
११५ म. गांधीनगर, औरंगाबाद - ४३१००५ मो. : ९८८१७४५६०४
Email : sayajiraogsps@gmail.com / www.sayajiraogaekwad.com

महाराजा सयाजीराव ज्ञानमाला : ३३

# महाराजा सयाजीराव
# आणि
# श्रीधर व्यंकटेश केतकर

सौरभ गायकवाड

महाराजा सयाजीराव संशोधन संस्था

महाराजा सयाजीराव
आणि श्रीधर व्यंकटेश केतकर
इतिहास
सौरभ गायकवाड
●
प्रकाशन क्रमांक - ५३
पहिली आवृती - २०२१
●
प्रकाशक
बाबा भांड
सचिव
महाराजा सयाजीराव गायकवाड
संशोधन-प्रशिक्षण संस्था
११५, म. गांधीनगर
औरंगाबाद - ४३१ ००५
Email : baba.bhand@gmail.com
sayajiraogsps@gmail.com
संपर्क : (०२४०) २३३२६९२
९८८१७४५६०४

महाराजा सयाजीराव ज्ञानमाला : ई-बुक
संपादक : दिनेश पाटील
●
लेखक : सौरभ गायकवाड,
महाडीक कॉलनी, टोप,
ता. हातकणंगले, जि कोल्हापूर,
पिन कोड – ४१६११२२
मो. ९१७५००१८६२
●
मुद्रक : प्रिंटवेल इंटरनॅशनल प्रा.लि.
जी-१२, एमआयडीसी,
चिकलठाणा, औरंगाबाद
●
मुखपृष्ठ : महेश मोधे
●
वितरक : साकेत प्रकाशन प्रा. लि.
औरंगाबाद
●
किंमत : २४ रुपये

---

● मुंबई सार्वजनिक विश्वस्त अधिनियम, १९५० अन्वये
संस्था नोंदणी क्र. एफ - २४५९६ (औ) दि. १-१२-२०१६
● या संशोधन-प्रकाशन प्रकल्पास दिलेली देणगी प्राप्तिकर कायद्याच्या
कलम ८०जी अंतर्गत सवलतीस पात्र
● **12AA Reg.No - ITBA/EXM/S/12AA/2018-19/
101507596(1) - 14-02-2019**
● **80 G Reg. No - ITBA/EXM/S/80G/2019-20/
1018507877(1) - 30-09-2019**

# महाराजा सयाजीराव ज्ञानमाला निर्मितीमागील भूमिका



महाराजा सयाजीराव गायकवाड हे फक्त आधुनिक भारतातील सगळ्यात प्रागतिक राजे होते असे नाही तर भारतासारख्या बहुसांस्कृतिक देशाचे 'बौद्धिक नेतृत्व'च ते करत होते. धर्म, जात, तत्त्वज्ञान, शिक्षण, दातृत्त्व, संशोधन, शेती, उद्योग, आरोग्य, क्रीडा, साहित्य, संस्कृती, ललित कला, प्राच्यविद्या, पुरातत्त्व, आंतरराष्ट्रीय संबंध, स्वातंत्र्यलढा इ. मानवी समाजाच्या सर्व अंगांना कवेत घेणाऱ्या क्षेत्रात त्यांनी निर्माण केलेले मानदंड आजही भारतासाठी आदर्श आहेत. त्यामुळे ते आधुनिक भारताचे निर्माते आणि म्हणूनच खरेखुरे 'महानायक' सुद्धा आहेत.

महापुरुषांचे चिंतन हे फक्त इतिहासाच्या स्वप्नरंजनासाठी किंवा इतिहासाचा पोकळ अभिमान बाळगण्यासाठी करायचे नसते. आपल्या समकालीन जगण्यातील समस्यांची उत्तरे शोधण्यासाठी, आपला जीवनसंघर्ष सकारात्मक करण्यासाठीसुद्धा या महापुरुषांचे पुनर्वाचन आवश्यक असते. इतिहास जितका वस्तुनिष्ठपणे आपण वर्तमानाशी जोडू तितका आपल्या समाजाचा भविष्यवेध आपल्याला अचूकपणे घेता येईल.

महाराजा सयाजीरावांचा 'उदोउदो' करण्यासाठी महाराजा सयाजीराव ज्ञानमालेची निर्मिती केलेली नाही. आजच्या आपल्या धार्मिक आणि जातीय संघर्षावर, शेती-उद्योगातील संकटांवर मात करण्यासाठी तसेच समाज म्हणून आपल्यातील 'विसंवाद' कमी करून 'सुसंवाद' वाढवण्याच्या व्यापक भूमिकेतून ही महाराजा सयाजीराव ज्ञानमाला आकाराला आली. या निमित्ताने आपला तुटलेला इतिहास 'जोडून' वाचण्याची आणि त्यातून संवादाचे पूल उभारण्याची प्रेरणा सर्वांना मिळेल एवढे मात्र नक्की.

पहिल्या टप्प्यात साठ ई-बुक झाली आहेत.

**दिनेश पाटील**
संपादक
**महाराजा सयाजीराव**
**ज्ञानमाला ई बुक प्रकल्प**

**बाबा भांड**
सचिव
**महाराजा सयाजीराव गायकवाड**
**सं. आणि प्र. संस्था, औरंगाबाद**

●●●



# महाराजा सयाजीराव
# आणि
# श्रीधर व्यंकटेश केतकर

भारतीय समाज आणि संस्कृती 'जात' या अत्यंत चिवट घटकाने नियंत्रित केलेली आहे. ती फक्त जन्माधिष्ठित आहे असे नाही तर टोकाची विषमता अबाधित ठेवणारीसुद्धा आहे. महात्मा फुल्यांपासून भारतीय समाजाला हजारो तुकड्यांमध्ये विभागणाऱ्या जातिव्यवस्थेची गंभीर चिकित्सा सुरू झाली. परंतु जातिव्यवस्थेचा उगम आणि विकास यांच्या शास्त्रीय अभ्यासाला संस्थात्मक पाठबळ देणारा आधुनिक भारतातील पहिला प्रशासक सयाजीराव होते हा इतिहास गेल्या ७० वर्षांत जातीच्या समाजशास्त्रीय अभ्यास करणाऱ्या एकाही अभ्यासकाच्या चर्चेत ओझरतासुद्धा आलेला नाही. परंतु जातीसंस्थेच्या उच्चाटनाबरोबरच तिच्या शास्त्रीय अभ्यासाला सयाजीरावांचे काय योगदान होते हे केतकरांच्या संदर्भाने समजून घेणे उपयुक्त ठरेल. जातीसंस्थेवरील जगातील पहिला पीएच. डी. प्रबंध सादर करणाऱ्या श्रीधर व्यंकटेश केतकरांच्या

संशोधनातील महाराजा सयाजीरावांचे योगदान जाणून घेणे महत्त्वाचे आहे कारण या संशोधनासाठी सयाजीराव महाराजांनी केतकरांना आर्थिक साहाय्य केले होते.

## अस्पृश्योद्धारक सयाजीराव

१९०९ मध्ये 'द इंडियन रिव्ह्यू' या इंग्रजी मासिकात प्रकाशित झालेल्या 'द डिप्रेस्ड क्लासेस' या निबंधात 'जातीचा प्रश्न सोडवला नाही तर ती भारतासाठी 'राष्ट्रीय आत्महत्या' असेल' असा इशारा देणाऱ्या सयाजीरावांनी 'कृती आणि प्रबोधना'च्या संतुलित समन्वयातून जात साक्षरतेचा 'महाप्रयोग' आपल्या संस्थानात राबवला. १८७७ मध्ये अहमदाबाद येथे अस्पृश्यांसोबत सहभोजन करत या महाप्रयोगाची सुरुवात केली. १८८३ मध्ये महाराजांनी स्वतःच्या राजवाड्यातील खंडोबाचे खाजगी मंदिर अस्पृश्यांसाठी खुले केले. १८८६ साली राजवाड्यातील अस्पृश्यांसाठी वेगळ्या जेवणाच्या पंगतीची पद्धत स्वतः त्या पंगतीत बसून मोडली. १५ ऑक्टोबर १८९६ रोजीच्या आदेशानुसार विजयादशमीपासून राजवाड्यातील सर्व धर्मकृत्ये वेदोक्त पद्धतीने करणे बंधनकारक केले. तर २३ जानेवारी १९१० रोजी सयाजीरावांनी बडोद्यातील सर्व अस्पृश्य विद्यार्थ्यांना राजवाड्यात मोठी मेजवानी दिली. स्वतःच्या कृतीतून जनतेसमोर जात निर्मूलनाचा आदर्श ठेवतानाच सयाजीरावांनी आपल्या संस्थानातील जनतेची जात साक्षरता वाढवण्यावर जाणीवपूर्वक भर दिला.

## जात साक्षरता

महाराजांनी जात साक्षरतेसाठी केलेल्या प्रयत्नांमध्ये जातीबद्दलची वस्तुनिष्ठ माहिती हिंदू धर्मग्रंथातून भाषांतरित करून प्रकाशित करणे, जातीवरच्या वैज्ञानिक संशोधनाला चालना देणे याबरोबरच जातीबद्दलची सांख्यिकीय माहिती एकत्रित करून प्रकाशित करणे अशा सर्व प्रयत्नांचा समावेश होता. १८८६ मध्ये सयाजीरावांनी आपल्या राजवाड्यात होणाऱ्या धार्मिक कृत्यांचे शास्त्रार्थ सांगणारा 'ऐनेराजमेहेल' हा ग्रंथ शंकर मोरो रानडे, कृष्णदेव महादेव समर्थ आणि भाऊ मास्तर यांच्याकडून तयार करून घेतला. तर १८९२ मध्ये राजवाड्याच्या देवघरातील धार्मिक विधींच्या खर्चाचे १,००० पानांचे तपशीलवार बजेट छापून पुस्तकरूपात प्रसिद्ध केले.

## धर्मचिकित्सक राजा

२२ ते २६ सप्टेंबर १९०१ या दरम्यान बडोद्यात स्वामी हंसस्वरूप या उच्चशिक्षित हिंदू धर्मपंडितांची परंपरावादी हिंदू धर्माचा पुरस्कार करणारी पाच व्याख्याने बडोद्यात झाली. ही व्याख्याने बडोद्यातील सनातनी मंडळींनी आयोजित केली होती. या पाच भाषणांना हजर राहून महाराजांनी स्वामी हंसस्वरूप यांची भूमिका समजून घेतली. धर्मातील 'जैसे थे वादी' तत्त्वज्ञानाचा त्यांचा आग्रह विज्ञानवादी सयाजीरावांना पटला नाही. या व्याख्यानांच्या अखेरीस उत्तर म्हणून केलेल्या भाषणात सयाजीरावांनी संस्कृत ग्रंथातील संदर्भ देत स्वामींचे सर्व मुद्दे

खोडून काढले. अखेर स्वामींनी आपला पराभव मान्य करत सयाजीरावांची माफी मागितली. सयाजीरावांचे धर्मविषयक अचूक आकलन स्पष्ट करण्यास ही बाब पुरेशी ठरते. यातून महाराजांच्या धर्मचिकित्सेवरील अधिकाराची प्रचिती येते.

## महाराजा सयाजीराव आणि वि. रा. शिंदे

१९०७ मध्ये सयाजीरावांनी बडोद्यातील न्यायमंदिरात विठ्ठल रामजी शिंदेंचे 'अस्पृश्योद्धार' या विषयावरील भाषण आयोजित केले होते. ते भाषण 'बहिष्कृत भारत' या मथळ्याखाली 'मनोरंजन' मासिकाच्या डिसेंबर १९०८ च्या अंकात प्रकाशित झाले. पुढे महाराजांच्या आज्ञेने हेच व्याख्यान 'बहिष्कृत भारत' या स्वतंत्र पुस्तक रूपाने प्रसिद्ध झाले. २० वर्षांनंतर १९२७ मध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी 'बहिष्कृत भारत' याच नावाचे पाक्षिक सुरू केले. विठ्ठल रामजी शिंदेंच्या 'बहिष्कृत भारत' या पुस्तिकेच्या एक हजार प्रती महाराजांनी विकत घेऊन बडोद्यात वाटल्या. हा विठ्ठल रामजी शिंदेचा या विषयावरील पहिला मराठी निबंध होता. हा निबंध म्हणजे पुढे शिंदेंच्या 'भारतीय अस्पृश्यतेचा प्रश्न' (१९३३) या प्रश्नाची समाजशास्त्रीय चर्चा करणाऱ्या मराठीतील पहिल्या ग्रंथाचा पाया होता. विठ्ठल रामजी शिंदेंनी हा ग्रंथ सयाजीरावांना अर्पण केला होता. दुर्दैवाने महाराजांच्या अन्य कार्याप्रमाणे हा इतिहाससुद्धा डॉ. रा.शं. वाळिंबेंच्या भाषेत 'जाणूनबुजून केलेले दुर्लक्ष' या सदरात टाकला गेला असावा अशी शंका येते.

## महाराजांचा अज्ञात परंतु अनमोल निबंध : The Depressed Classes

भारतीय समाजाच्या उत्कर्षामध्ये अडथळा ठरणाऱ्या जातिव्यवस्थेची सप्रमाण चिकित्सा करणाऱ्या १९०९ मधील महाराजा सयाजीरावलिखित 'The Depressed Classes' या ऐतिहासिक इंग्रजी निबंधाचा उल्लेख सुरुवातीलाच आला आहे. या निबंधात सयाजीरावांनी जातीचा उगम, विकास आणि अंत यांचे वैज्ञानिक सूत्र मांडले आहे. हा निबंध म्हणजे डॉ. आंबेडकरांच्या १९३६ मधील 'Annihilation Of Caste' या जगप्रसिद्ध भाषण-निबंधाची पूर्वतयारी होती. १९१० मध्ये सयाजीरावांच्या प्रेरणेने आणि आर्थिक सहकार्याने श्रीपाद दामोदर सातवळेकर यांनी 'स्पर्शास्पर्श अथवा चारही वर्णांचा परस्पर व्यवहार' हा ग्रंथ लिहिला.

## तुलनात्मक धर्मअभ्यासक राजा

१९१६ मध्ये महाराजांनी बडोदा कॉलेजमध्ये तत्त्वज्ञान आणि तुलनात्मक धर्म अभ्यासाच्या अध्यासनाची स्थापना केली. या अध्यासनातर्फे १९१८ मध्ये तुलनात्मक धर्म अभ्यासासाठी 'गायकवाड स्टडीज इन रिलीजन अँड फिलॉसॉफी' ही ग्रंथमाला सुरू करण्यात आली. ही आजवरची भारतातीलच नव्हे तर जगातील अशा प्रकारची पहिली आणि एकमेव ग्रंथमाला आहे. या ग्रंथमालेत १७ ग्रंथ प्रकाशित झाले. १९१७ पासून

महाराजांनी धर्मखात्याच्या वतीने 'प्राचीन भारतीय संस्कृती आणि तुलनात्मक धर्म' या विषयांवर सार्वजनिक व्याख्यानांच्या आयोजनास सुरुवात केली. १९२८ मध्ये सयाजीरावांनी 'Tribe and Caste Of Bombay' या पुस्तकाचे गोविंद मंगेश कालेलकर यांच्याकडून मराठी भाषांतर करून घेऊन 'मुंबई इलाख्यातील जाती' या नावाने सयाजीसाहित्य मालेत प्रकाशित केले.

१९२८ मध्येच बडोदा संस्थानकडून प्रकाशित करण्यात आलेला 'A Glossary of Castes, Tribes and Races In The Baroda State' हा ग्रंथदेखील जात साक्षरतेच्या प्रयत्नांचाच भाग होता. या ग्रंथाच्या निर्मितीमागील महाराजांची भूमिका ग्रंथाचे संकलक गोविंदभाई देसाई यांनी स्पष्ट केली आहे. देसाई लिहितात, "His Highness the Maharaja Saheb having been pleased to order that this glossary should be reprinted as a separate publication, this little volume has been issued in the hope that it will prove useful at least for the collection of further interesting information about the various Castes, Tribes and Races in the State. Some additional information regarding Sadhus and Fakirs which did not appear in the original glossary has been added to this publication." सयाजीरावांनी जात साक्षरतेसाठी ग्रंथ प्रकाशनाच्या आणि संशोधनाच्या माध्यमातून दिलेल्या

प्रोत्साहनाचा हा आढावा आपल्याला नवी दृष्टी देतो. १९०९ मध्ये बडोद्याच्या साहित्य संमेलनातील एक निवड आपल्याला विचारास प्रवृत्त करते. १९०९ चे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन बडोद्यात झाले. या संमेलनाच्या अध्यक्षपदी निवड झालेले मुंबईचे के.आर.किर्तीकर हे पहिले ब्राह्मणेत्तर अध्यक्ष होते. कारण या अगोदरचे सर्व अध्यक्ष ब्राह्मण होते. ही किमया सयाजीरावांमुळेच घडून आली.

## जातविषयक पथदर्शी संशोधन आणि सयाजीराव

सयाजीरावांनी जात साक्षरतेसाठी राबवलेल्या महाप्रकल्पाचे प्रमुख लाभार्थी असणाऱ्या ज्ञानकोशकार केतकरांचा जन्म २ फेब्रुवारी १८८४ रोजी मध्यप्रदेशातील रायपूर येथे झाला. त्यांचे सुरुवातीचे शिक्षण अमरावतीत झाले. मुंबईमधील विल्सन महाविद्यालयामध्ये त्यांनी पुढील शिक्षण घेतले. महाविद्यालयीन शिक्षणानंतर सयाजीरावांनी दिलेल्या शिष्यवृत्तीच्या जोरावर केतकर जातीवरच्या समाजशास्त्रीय संशोधनासाठी अमेरिकेला गेले. ही अमेरिकावारी केतकरांच्या आयुष्याला निर्णायक वळण देणारी ठरली.

अमेरिकेतील जातीवरील समाजशास्त्रीय संशोधनासाठी सयाजीरावांनी केतकरांना दिलेली शिष्यवृत्ती १९०६ ते १९०९ अशी तीन वर्ष होती. परंतु या तीन वर्षात केतकरांचे संशोधन पूर्ण झाले नाही. केतकरांच्या पीएच.डी.गाईडच्या शिफारशीवरून महाराजांनी प्रशासकीय नियमांना मुरड घालत ही शिष्यवृत्ती एक

वर्ष वाढवून दिली. त्यामुळे केतकर १९०६ ते १९१० अशी ४ वर्ष शिष्यवृत्तीचा लाभ घेऊ शकले. सयाजीरावांनी श्रीधर व्यंकटेश केतकर यांना दिलेली शिष्यवृत्ती ही जातीवरच्या संशोधनासाठीची पहिली शिष्यवृत्ती आहे. घरच्यांचा विरोध पत्करून अमेरिकेला गेलेले केतकर सयाजीरावांच्या शिष्यवृत्तीमुळेच 'द हिस्ट्री ऑफ कास्ट इन इंडिया' हा आपला पीएच.डी. प्रबंध कोर्नेल विद्यापीठाला सादर करू शकले. केतकरांनी सादर केलेल्या या प्रबंधाला १९११ मध्ये कोर्नेल विद्यापीठाने पीएच.डी. ही सर्वोच्च पदवी प्रदान केली. संपूर्ण जगातील जातीवरचा हा पहिला संशोधनात्मक प्रबंध होता. याच नावाने हा प्रबंध १९०९ मध्ये प्रकाशित झाला. त्या काळात अमेरिकेत प्रबंध प्रकाशित झाल्यानंतरच पदवी दिली जात होती. या प्रबंधात मनुस्मृतीचा काल निश्चित केला असून मनुस्मृतिकालीन समाजस्थितीचे विशेषतः जातिसंस्थेचे स्वरूप उलगडून दाखविले आहे. जातिभेद व वंशभेद एकरूप नसून भिन्न आहेत, हा विचारही यात मांडला आहे. केतकरांचा हा प्रबंध जगभर गाजला. या ग्रंथाच्या प्रस्तावनेत त्यांनी अमेरिकेतील त्यांच्या मार्गदर्शकांबरोबरच प्रबंधाचे टंकलेखक आणि प्रूफरीडर या व्यक्तींचेदेखील कृतज्ञतापूर्वक आभार मानले. परंतु ज्यांच्या शिष्यवृत्तीमुळे केतकर हे जगप्रसिद्ध संशोधन करू शकले त्या सयाजीरावांचा साधा उल्लेखसुद्धा त्यांनी आपल्या प्रस्तावनेत केला नाही. ही बाब केतकरांसारख्या संशोधकाला न शोभणारी होती.

## क्षमाशील राजाचे दर्शन

बडोदा संस्थानच्या शिष्यवृत्तीचा लाभ घेणाऱ्या विद्यार्थ्याला शिक्षण पूर्ण झाल्यानंतर ठरावीक वर्षे बडोद्यात नोकरी करणे बंधनकारक असे. या नियमानुसार अमेरिकेतून परतल्यानंतर केतकरांना सयाजीरावांनी बडोदा कॉलेजमध्ये प्राध्यापक म्हणून नोकरी देऊ केली होती. परंतु ही नोकरी त्यांनी नाकारली. यासंदर्भात केतकरांचे चरित्रकार द.ना.गोखले म्हणतात, "राष्ट्रगुरुची भूमिका वटविण्याच्या मनोदयामुळे त्यांनी बडोदे संस्थानची नोकरी पत्करली नाही. सयाजीराव महाराजांनी अमेरिकेतील शिक्षणासाठी त्यांना शिष्यवृत्ती दिलेली असल्यामुळे शिक्षण संपल्यावर बडोदे संस्थानात नोकरी करण्याचे बंधन त्यांच्यावर होते. पण इंग्रजी भाषेत प्राध्यापकी करण्यास आपण नाखुश आहोत, या सबबीवर त्या बंधनातून सयाजीरावांकडून स्वत:ला त्यांनी सोडवून घेतले."

तर १९४६ मध्ये केतकरांचे चरित्र लिहिणारे दाते आणि कर्वे यासंदर्भात म्हणतात, '...आपण मराठी भाषेतच काही कार्य करावयाचे योजिले असून तशी सोय, म्हणजे विश्वविद्यालय इत्यादी जर बडोद्यात होणार असेल तर आपण तेथे सेवा करण्यास येऊ' असे डॉ. केतकर यांनी श्रीमंत सयाजीराव महाराजांना कळविले होते. मात्र केतकरांच्या अपेक्षेप्रमाणे बडोद्यात तसे विद्यापीठ नसल्यामुळे किंवा काही अन्य कारणामुळे केतकरांना शिष्यवृत्तीच्या अटीनुसार बडोद्यात नोकरी करण्यात सयाजीरावांकडून सूट देण्यात आली.

केतकरांचे जातीवरचे हे संशोधन आजही समाजशास्त्रातील पहिले म्हणूनच पथदर्शी मानले जाते. पुढे बाबासाहेबांनी १९१६ मध्ये जातीच्या उत्पत्तीवरील जो निबंध अमेरिकेतील कॅलिफोर्निया विद्यापीठात सादर केला त्यातही त्यांनी केतकरांच्या या संशोधनाचा आधार घेतला होता. केतकरांची 'जात म्हणजे बंदिस्त वर्ग' ही व्याख्या बाबासाहेबांनी त्यांच्या अस्पृश्यता निर्मूलनासाठीच्या संशोधनात प्रमाणभूत म्हणून स्वीकारली होती. महाराष्ट्राबरोबर जगभरातील जातविषयक चर्चाविश्वाला जे संशोधन उपयुक्त ठरले ते सयाजीरावांच्या पाठबळामुळे शक्य झाले होते.

## ज्ञानकोशकार केतकर

केतकरांना महाराजांनी दिलेली शिष्यवृत्ती ही खऱ्या अर्थाने भारताच्या बौद्धिक विश्वाला दिलेली देणगी आहे. याबरोबरच सयाजीरावांनी केतकरांच्या ज्ञानकोशाला भारतीय जनतेची साक्षरता वाढवण्यासाठीच्या प्रयत्नांचा भाग म्हणून कर्तव्यभावनेने मदत केली. केतकरांनी एकूण २३ खंडात मराठीत तयार केलेला हा ज्ञानकोश म्हणजे मराठी ज्ञानभाषा करण्याचा एक महत्त्वाचा प्रयत्न आहे. १९२१ ते १९२७ अशी ७ वर्षे या ज्ञानकोशाचे काम केतकरांच्या नेतृत्वाखाली सुरू होते. हा ज्ञानकोश गुजराथी भाषेतही अनुवादित झाला. मराठी व गुजराथी अशा दोन्ही ज्ञानकोशांना महाराजांनी आर्थिक साहाय्य केले होते. महाराजांनी केलेल्या साहाय्याबद्दल चिं.ग. कर्वे

म्हणतात, "महाराष्ट्रीय ज्ञानकोशाच्या २००० रुपये किमतीच्या प्रती सयाजीरावांनी विकत घेतल्या होत्या." महाराजांनी केलेली २,००० रु. ची ही आर्थिक मदत आजच्या रुपयाच्या मूल्यात ५६ लाख ३४ हजारांहून अधिक भरते.

केतकरांनी महाराष्ट्रीय ज्ञानकोशाची संक्षिप्त आवृत्ती म्हणून गुजराथी ज्ञानकोशही तयार केला. सयाजीराव ज्या बडोद्याचे राजे होते तेथील प्रजेची मातृभाषा गुजराथी असल्यामुळे या कोशाचे काम सुरू असल्याचे कळताच या कोशालाही कोश प्रकाशित होण्याअगोदर आर्थिक साहाय्य केले. या संदर्भात कर्वेंची नोंद महत्त्वाची आहे. कर्वे लिहितात, "डॉ. केतकर तयार करत असलेल्या गुजराथी ज्ञानकोशाला आगाऊ ५००० रुपये विद्याखात्यातर्फे देण्यात आले." आजच्या रुपयाच्या मूल्यात ही रक्कम १ कोटी ३९ लाख रु.हून अधिक भरते. मराठी आणि गुजराथी ज्ञानकोशासाठी सयाजीरावांनी केतकरांना केलेले आर्थिक साहाय्य आजच्या रुपयाच्या मूल्यात १ कोटी ९६ लाख रु. इतके भरते.

अमेरिकेतील शिष्यवृत्तीचा उल्लेख ज्याप्रमाणे केतकरांनी त्यांच्या 'द हिस्ट्री ऑफ कास्ट इन इंडिया' या प्रबंधाच्या प्रस्तावनेत केलेला नाही तसाच या मदतीचादेखील उल्लेख ज्ञानकोशाच्या प्रस्तावनेतही केला नाही. केतकरांच्या 'माझे बारा वर्षांचे काम ऊर्फ ज्ञानकोशमंडळाचा इतिहास' या ग्रंथातही महाराजांनी केलेल्या मदतीचा उल्लेख आढळत नाही हे

विशेष. केतकरांना ज्ञानकोशाची कल्पना त्यांच्या अमेरिकेतील शिक्षणादरम्यान तेथील अमेरिकेतील विश्वकोशाचे काम पाहून सुचली. त्यामुळे केतकरांच्या ज्ञानकोशाच्या कामाची प्रेरणासुद्धा सयाजीरावच ठरतात. विशेष म्हणजे शिष्यवृत्ती घेऊनही बडोद्यात नोकरी न करण्याच्या निर्णयानंतरसुद्धा पुढे सयाजीरावांनी या ज्ञानकोशांना आर्थिक पाठबळ दिले. ही बाब कोणताही पूर्वग्रह न ठेवता समाजोपयोगी कामाच्या मागे उभे राहण्याची महाराजांची विशाल दृष्टी दर्शवते.

## द्वेषमुक्त सयाजीराव आणि विक्षिप्त केतकर

१९०६ ची शिष्यवृत्ती, १९२७ च्या दरम्यान ज्ञानकोशाला केलेले साहाय्य विचारात घेता सयाजीरावांप्रती केतकरांची दृष्टी कृतज्ञ असायला हवी होती परंतु तसे दिसत नाही. कारण पुढे १९३२ मध्ये व्याख्याने देण्यासाठी महाराजांनी त्यांना बडोद्याला बोलवले. परंतु या भेटीत काही कारणाने महाराज व त्यांचे संबंध बिघडले. फारशी व्याख्याने न देता ते परतले. या भेटीत बडोदा विद्यापीठाच्या स्थापनेसंदर्भात त्यांच्यात चर्चा झाली. पुण्याला परत आल्यावर केतकरांनी महाराजांना नोटीस पाठवली. याचा विस्तृत आढावा गोखलेंनी त्यांच्या केतकर चरित्रात घेतला आहे. तो त्यांच्याच शब्दात समजून घेणे मनोरंजक ठरेल. गोखले लिहितात, “१९३२ च्या फेब्रुवारी महिन्यात सयाजीराव महाराज गायकवाडांनी व्याख्याने देण्यासाठी त्यांना बडोद्यास बोलावले आणि बोलावण्याप्रमाणे शीलवतीबाईंसह ते बडोद्याला गेले.

तेथे काहीतरी निमित्त होऊन सयाजीरावांचे नि त्यांचे संबंध बिघडले व त्यांची फारशी व्याख्याने न होता त्यांना दहापंधरा दिवस तेथे लोंबकळत राहावे लागले. सयाजीरावांनी या भेटीत बडोदा विद्यापीठाच्या स्थापनेबद्दल त्यांचा सल्ला घेतला, असे काही लोक सांगतात. काय नक्की झाले कोणास ठाऊक, पण पुण्याला परतल्यावर केतकरांनी सयाजीरावांना अशी एक नोंदलेली नोटीस पाठविली, की 'तुम्ही रोज पन्नास रुपयांप्रमाणे पंधरा दिवसांची 'कन्सल्टेशन फी' पाठवून द्यावी, नाहीतर तुमच्यावर फिर्याद करावी लागेल'! खरे म्हणजे, सयाजीरावांनी मोठ्या उदारपणाने शिक्षणासाठी अमेरिकेत त्यांना मदत केली होती व ते हिंदुस्थानात आल्यावर बडोदे-संस्थानात नोकरी करण्याची त्यांच्यावरील अट काढून टाकली होती. तेव्हा या प्रसंगी काहीही घडलेले असले तरी त्यांनी सयाजीरावांना फिर्यादीची धमकी देणे अत्यंत अनुचित होते. पण केवळ फिर्यादीचे वेड डोक्यात असल्यामुळे त्यांना औचित्याचे भान राहिले नाही. पुढे सयाजीरावांनी त्यांच्या नोटिशीकडे लक्ष दिले नाही."

या सर्व प्रकरणाकडे महाराजांनी नेहमीप्रमाणे दुर्लक्ष केले. पुढे २७ ते ३० डिसेंबर १९३३ दरम्यान सयाजीरावांनी बडोद्यात अखिल भारतीय प्राच्यविद्या परिषदेचे आयोजन केले. या परिषदेच्या २९ डिसेंबरच्या मराठी भाषा सत्राच्या अध्यक्षपदी डॉ. केतकरांची निवड करण्यात आली. या परिषदेच्या भाषणात

सुद्धा मराठी भाषेच्या आणि साहित्याच्या संवर्धनात बडोद्याचे किंवा महाराजांचे काय योगदान आहे याबद्दल एक शब्दही केतकर बोलले नाहीत. महत्त्वाचे म्हणजे १८८५ पासून ४८ वर्षे मराठी भाषा आणि साहित्याच्या विकासाचे महाराष्ट्रात झाले नाही एवढे काम महाराजांनी बडोद्यात केले होते. हे सर्व विचारात घेता केतकरांना महाराजांकडून झालेली मदत आणि मिळालेला सन्मान हे महाराष्ट्रासाठी प्रेरणादायी आहे. येथे एक बाब नमूद करावी लागेल ती अशी की फेब्रुवारी १९३२ च्या नोटीस प्रकरणानंतर महाराजांनी कोणतीही कटुता मनात न ठेवता या घटनेनंतर १० महिन्यांतच प्राच्यविद्या परिषदेत डिसेंबर १९३३ मध्ये मराठी भाषा सत्राचे अध्यक्षपद सन्मानाने दिले. यातून महाराजांचा सुसंस्कृतपणा, क्षमाशील वृत्ती आणि विशाल दृष्टीची प्रचिती येते.

## केतकरांचा जातीभिमान

केतकरांना कोकणस्थपणाचा आणि ब्राम्हणपणाचा खूपच अभिमान होता त्यामुळे ते म्हणत की, 'ज्या जातीला हिंदुस्थानवर सत्ता गाजविण्याचे अधिकार अठराव्या शतकात मिळाले होते व ज्या जातीने हिंदुस्थानच्या एकीकरणाचे धडे प्रथम घालून दिले त्या महाराष्ट्रीय ब्राम्हण जातीत माझा जन्म झाला आहे !' १९३० च्या दशकात तर ते स्वत:ला केवळ थोर नाही तर 'थोर ब्राम्हण' समजत असत. याचे उत्तम उदाहरण म्हणजे सयाजीराव महाराज गायकवाडांच्या हीरकमहोत्सवाचे

वेळी केतकरांनी सयाजीरावांना दिलेला आशीर्वाद होय. हा आशीर्वाद देताना केतकरांनी 'ब्राम्हण या नात्याने आपणास व आपल्या कुळास आशीर्वाद देतो' असे म्हणून दिला होता. यावरून केतकरांची आत्मश्रेष्ठीपणा दर्शवणारी मानसिकता स्पष्ट दिसून येते. केतकर आणि सयाजीराव हे नाते आधुनिक महाराष्ट्राच्या जडणघडणीच्या चौकटीत तपासले असता केतकरांना महाराजांकडून मिळालेले साहाय्य आणि पाठबळ महत्त्वाचे होते. कारण जातीवरचे वस्तुनिष्ठ संशोधन हे जातीअंताचा कार्यक्रम तयार करण्यासाठी बाबासाहेबांसह संपूर्ण महाराष्ट्राला उपयुक्त ठरले. तर ज्ञानकोशासाठी केलेली मदत मराठी भाषेला 'ज्ञानभाषा' म्हणून श्रीमंत करून गेली. केतकरांच्या माध्यमातूनही 'बडोद्याची' ही 'सयाजीऊर्जा' महाराष्ट्राला बलशाली करण्यास उपयुक्त ठरली.

●●●

## महाराजा सयाजीराव ज्ञानमाला नामसूची

१) शिवसृष्टीचे निर्माते - सागर मोहिते
२) कृतीशील सत्यशोधक - दिनेश पाटील
३) राजर्षी शाहू - दिनेश पाटील
४) एक 'क्रांतीपर्व' - आंबेडकर
- दिनेश पाटील
५) दानशूर महाराजा सयाजीराव
- डॉ. राजेंद्र मगर
६) दामोदर सावळाराम यंदे - राजश्री कदम
७) खासेराव जाधव - शिवानी घोंगडे
८) कृष्णराव अर्जुन केळूसकर
- सुरक्षा घोंगडे
९) सावित्रीबाई फुले - शिवानी घोंगडे
१०) विठ्ठल रामजी शिंदे - पवन साठे
११) गंगारामभाऊ म्हस्के - दिनेश पाटील
१२) रियासतकार गो. स. सरदेसाई
- दिनेश पाटील
१३) योगी अरविंद घोष - डॉ. राजेंद्र मगर
१४) महाराणी चिमणाबाई सयाजीराव गायकवाड - सुरक्षा घोंगडे
१५) कर्मवीर भाऊराव पाटील
- शिवानी घोंगडे
१६) बडोद्यातील वेदोक्त - राजश्री कदम
१७) धर्म खाते - सुरक्षा घोंगडे
१८) हिंदू पुरोहित कायदा - देवदत्त कदम
१९) तुलनात्मक धर्मचिंतक - देवदत्त कदम
२०) जातविषयक चिंतन - सुरक्षा घोंगडे
२१) इंदिराराजेंचा क्रांतिकारक विवाह
- देवदत्त कदम
२२) हिंदू कोड बिल - देवदत्त कदम
२३) दुसरी जागतिक सर्वधर्म परिषद
- डॉ. राजेंद्र मगर
२४) सक्तीचा प्राथमिक शिक्षण कायदा
- राजश्री कदम
२५) स्त्रीविषयक कार्य - शिवानी घोंगडे
२६) मराठी भाषा, साहित्य व संस्कृती
- निलोफर मुजावर
२७) संस्कृत शिक्षण - निलोफर मुजावर
२८) धर्मानंद कोसंबी - निलोफर मुजावर
२९) बौद्ध धर्म - सौरभ गायकवाड
३०) मराठी पत्रकरीता - सौरभ गायकवाड
३१) नानासाहेब शिंदे - देवदत्त कदम
३२) महात्मा गांधी - दिनेश पाटील
३३) श्रीधर व्यंकटेश केतकर
- सौरभ गायकवाड
३४) प्राच्यविद्या - सौरभ गायकवाड
३५) आरोग्य आणि व्यायामविषयक कार्य - शिवानी घोंगडे
३६) अखिल भारतीय मराठा शिक्षण परिषद - सत्यनारायण आरडे
३७) भारताचा स्वातंत्र्यलढा
- राहुल वणवे
३८) महाराजा सयाजीराव आणि जगप्रवास - दिनेश पाटील
३९) निर्व्यसनी, चारित्र्यवान, सार्वभौम राजा - बाबा भांड
४०) ललितकला - धारा भांड मालुंजकर

४१) राजा रवी वर्मा - धारा भांड मालुंजकर
४२) बालगंधर्व - धारा भांड मालुंजकर
४३) दादासाहेब फाळके
- धारा भांड मालुंजकर
४४) बडोद्यातल्या वास्तू
- धारा भांड मालुंजकर
४५) संगीत शिक्षण - धारा भांड मालुंजकर
४६) बडोद्याचे कलाभवन
- सौरभ गायकवाड
४७) बँक ऑफ बडोदा - देवदत्त कदम
४८) दुष्काळ दौऱ्याच्या नोंदी
- दिनेश पाटील
४९) शेतीविकास - देवदत्त कदम
५०) उद्योग विकास - सौरभ गायकवाड
५१) सहकार विकास - राहुल वणवे
५२) जलनियोजन (जलसंवर्धन)
- डॉ. राजेंद्र मगर
५३) पूरनिवारण - डॉ. राजेंद्र मगर
५४) सत्यशोधक धामणस्कर
- सत्यनारायण आरडे
५५) बडोद्याचा लक्ष्मीविलास पॅलेस
- पवन साठे
५६) लोकपाळ राजा सयाजीराव : चरित्र
- बाबा भांड
५७) यशवंतराव चव्हाण - दिनेश पाटील
५८) धर्म विचार - बाबा भांड
५९) राजाराम शास्त्री भागवत - बाबा भांड
६०) छत्रपती शाहू - बाबा भांड
६१) महाराजा सयाजीराव 'प्रजासत्ताक' राजा - अनिल वकटे
६२) महात्मा फुले, मामा परमानंद आणि सयाजीरावांना पत्रे - मामा परमानंद
६३) बहुजनांच्या शिक्षणासाठी मदत
- बाबा भांड
६४) आरक्षण : सयाजीरावांचे आणि शाहुंचे - दिनेश पाटील
६५) दानशूर महाराजा सयाजीराव आणि जमशेटजी टाटा - डॉ. राजेंद्र मगर

आपणास वरील पैकी काही ई-बुक हवे असल्यास संपर्क करावा

बाबा भांड - ९८८१७४५६०४, दिनेश पाटील -९६२३८५८१०४,
डॉ. राजेंद्र मगर -९४२०३७८८५०, धारा भांड मालुंजकर - ९८८१७४५६०८
महेश मोधे - ८७८८२०८९९०

## महाराजा सयाजीराव प्रकाशित साहित्य :



**❐ महाराष्ट्र शासन : २५ खंडातील ६२ ग्रंथ = २६६४२ पृष्ठे**

**<u>मराठी :</u>**

- भाषण संग्रह : २ ग्रंथ
- पत्रसंग्रह : ३ ग्रंथ
- गौरवगाथा : १ ग्रंथ
- सयाजीराव लेखन : २ ग्रंथ
- सुप्रशासन : २ ग्रंथ
- जगप्रवास : ३ ग्रंथ
- शिक्षण सुधारणा : १ ग्रंथ
- आठवणी व लेख : ३ ग्रंथ
- सयाजीराव चरित्रे : ५ ग्रंथ
- सुधारणा : १० ग्रंथ = एकूण ३२ ग्रंथ

**<u>English</u>**

- Spechess & Adresses : 2 Books
- Letters : 4 Books
- Writings of Sayajirao : 2 Books
- Administration : 1 Books
- World Tour Reports : 3 Books
- Education Reforms : 3 Books
- Biographies : 5 Books
- Total English Books : 20

**<u>हिन्दी :</u>**

- सयाजीराव का लेखन : १
- स्वतंत्र्य युद्ध के समर्थक : १
- सयाजीराव जीवनी : २
- भाषण संग्रह : २
- पत्र संग्रह : ३
- गौरवगाथा : १ = १० ग्रंथ

**साहित्य संस्कृती मंडळ आणि अकादमी : ५ ग्रंथ**

- महाराजा सयाजीराव ट्रस्ट : ३० ग्रंथ
- साकेत प्रकाशन प्रा. लि. औरंगाबाद
  कथा, कादंबरी, चरित्र्य, इतिहास, बोधकथा, किशोर कादंबरी, फुले, आंबेडकर, लिखित - संपादित १३ ग्रंथ

---

- महाराष्ट्र शासन प्रकाशित ग्रंथ शासकीय ग्रंथ गार आणि अधिकृत विक्रेते साकेत प्रकाशन यांचेकडे उपलब्ध.
- सयाजीराव ट्रस्ट, शासन व साकेत प्रकाशनाचे महाराजा सयाजीरावांचे वरील ग्रंथ उपलब्ध :

---

साकेत प्रकाशन प्रा. लि., ११५ महात्मा गांधीनगर, औरंगाबाद ४३१००५
मो. : ९८८१७४५६०५, ९८८१७४५६०४

●●●

# महाराजा सयाजीराव ज्ञानमाला निर्मितीमागील भूमिका

महाराजा सयाजीराव गायकवाड हे फक्त आधुनिक भारतातील सगळ्यात प्रागतिक राजे होते असे नाही तर भारतासारख्या बहुसांस्कृतिक देशाचे 'बौद्धिक नेतृत्व'च ते करत होते. धर्म, जात, तत्त्वज्ञान, शिक्षण, दातृत्त्व, संशोधन, शेती, उद्योग, आरोग्य, क्रीडा, साहित्य, संस्कृती, ललित कला, प्राच्यविद्या, पुरातत्त्व, आंतरराष्ट्रीय संबंध, स्वातंत्र्यलढा इ. मानवी समाजाच्या सर्व अंगांना कवेत घेणाऱ्या क्षेत्रात त्यांनी निर्माण केलेले मानदंड आजही भारतासाठी आदर्श आहेत. त्यामुळे ते आधुनिक भारताचे निर्माते आणि म्हणूनच खरेखुरे 'महानायक' सुद्धा आहेत.

महापुरुषांचे चिंतन हे फक्त इतिहासाच्या स्वप्नरंजनासाठी किंवा इतिहासाचा पोकळ अभिमान बाळगण्यासाठी करायचे नसते. आपल्या समकालीन जगण्यातील समस्यांची उत्तरे शोधण्यासाठी, आपला जीवनसंघर्ष सकारात्मक करण्यासाठीसुद्धा या महापुरुषांचे पुनर्वाचन आवश्यक असते. इतिहास जितका वस्तुनिष्ठपणे आपण वर्तमानाशी जोडू तितका आपल्या समाजाचा भविष्यवेध आपल्याला अचूकपणे घेता येईल.

महाराजा सयाजीरावांचा 'उदोउदो' करण्यासाठी महाराजा सयाजीराव ज्ञानमालेची निर्मिती केलेली नाही. आजच्या आपल्या धार्मिक आणि जातीय संघर्षावर, शेती-उद्योगातील संकटांवर मात करण्यासाठी तसेच समाज म्हणून आपल्यातील 'विसंवाद' कमी करून 'सुसंवाद' वाढवण्याच्या व्यापक भूमिकेतून ही महाराजा सयाजीराव ज्ञानमाला आकाराला आली. या निमित्ताने आपला तुटलेला इतिहास 'जोडून' वाचण्याची आणि त्यातून संवादाचे पूल उभारण्याची प्रेरणा सर्वांना मिळेल एवढे मात्र नक्की.

पहिल्या टप्प्यात साठ ई-बुक झाली आहेत.

**बाबा भांड**
सचिव

**दिनेश पाटील**
संपादक
महाराजा सयाजीराव ज्ञानमाला

**महाराजा सयाजीराव गायकवाड संशोधन व प्रशिक्षण संस्था**
११५, म. गांधीनगर, स्टेशन रोड,
औरंगाबाद - ४३१ ००५
मो. - ९८८१७४५६०४
ई-मेल : sayajiraogsps@gmail.com